# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | **पीक/वाणाचे नाव** | **कापूस : पीए ४०२ (विनायक)** |
| २ | **प्रसारीत केल्याचे वर्ष** | २००४ |
| ३ | **प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ** | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | **जमीन** | मध्यम |
| ५ | **हवामान** | कोरडवाहू<br>(६० ते ७५ सेंमी पाऊस, दिवसा उष्ण व रात्री थंड हवामान) |
| ६ | **पेरणी/लागवडीचा कालावधी** | खरीप (जून-जुलै) मॉन्सूनचा ७० ते ८० मिमी पाऊस पडताच पेरणी करावी. १५ जुलैनंतर पेरणी करु नये. |
| ७ | **प्रती एकर बियाणे** | ४ ते ५ किलो |
| ८ | **पीक व्यवस्थापन** | |
| | **१ लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन** | **जमिनीची निवड :-** कपाशीच्या लागवडीसाठी मध्यम ते भारी, कसदार व पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन आवश्यक आहे.<br>**पूर्व मशागत :-** शेतातील मागील वर्षाचे पीक निघाल्याबरोबर खोल नांगरणी करुन मोगडणी करावी. तीन ते चार वखराच्या पाळया घ्याव्या. शेवटची वखरपाळी पूर्वी ५ टन (१०-१२ गाडया) शेणखत पसरुन टाकावे.<br>**पिकांची फेरपालट :-** कपाशीवर कपाशीचे पीक घेऊ नये. कोरडवाहू लागवडीमध्ये हरभरा व ज्वारी या पिकानंतर कापूस पीक घ्यावे.<br>**पेरणीची वेळ :-** कापसाची लागवड मान्सूनच्या ७० ते ८० मिमी पाऊस पडताच करावी. १५ जुलैनंतर कपाशीची पेरणी करु नये.<br>**पेरणीची पध्दत :-** पेरणी टोकण पध्दतीने करावी. ओळीतील अंतर ४५ से.मी. व रोपांतील अतर २२.५० से.मी. ठेवावे. सर्वसाधारणपणे एका फुलीवर दोन बिया टाकाव्यात.<br>**बियाण्याचे प्रमाण :-** प्रती हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे लागते.<br>**बीज प्रक्रिया :-** नत्र स्थिरीकरणासाठी ॲझोटोबॅक्टर व स्फुरद विद्राव्य करणा-या जीवाणुंची बीज प्रक्रिया २५ ग्रॅम प्रती कि.ग्रॅ. बियाणे या प्रमाणात पेरणीपूर्वी करावी. |
| | **२ खत व्यवस्थापन** | मराठवाडयात कोरडवाहू लागवडीमध्ये देशी कापूस पिकास ५०:२५:२५: कि.ग्रॅम / हेक्टर नत्र, स्फुरद व पालाश या प्रमाणात खताची मात्रा द्यावी. यापैकी ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीच्या वेळीच अथवा पेरणीपूर्वी द्यावे. उर्वरित ५० टक्के नत्र ४५ दिवसांनी द्यावे. |
| | **३ पाणी व्यवस्थापन** | शेवटच्या आंतरमशागतीपूर्वी कोळप्याच्या जानोळयास दारी अथवा पोते बांधून उतारास आडव्या स-या पाडाव्यात. त्यामूळे शेवटच्या पावसाचे पाणी जमिनीत जास्त मुरेल व त्याचा फायदा बोंडे पक्व होण्यासाठी होईल. पावसाचा दीर्घ खंड पडल्यास पाण्याच्या एक ते दोन पाळया द्याव्यात. |

<table>
<tr><td></td><td>४</td><td>कीड व्यवस्थापन</td><td>
<table>
<tr><th>कीड</th><th>कीटकनाशक</th><th>प्रमाण / प्रती १० लीटर पाणी</th></tr>
<tr><td>मावा, तुडतुडे व फुलकिडे</td><td>डायमेथोएट ३० ईसी<br>मिथील डिमेटॉन २५ ईसी<br>ॲसिटामीथ्रीड २० एसपी<br>इमिडाक्लोप्रीड १७.८ एसएल<br>थायोमिथाक्झाम २५ डब्ल्युजी<br>फिप्रोनील ५ एससी</td><td>१० मिली<br>८ मिली<br>२ ग्रॅम<br>४ मिली<br>३ ग्रॅम<br>२० मिली</td></tr>
<tr><td>पांढरी माशी</td><td>ट्रायझोफॉस ४० ईसी<br>ड्रायफेन्थुरॉन ५० डब्ल्यु पी</td><td>२० मिली<br>८ ग्रॅम</td></tr>
<tr><td>पिठया<br>ढेकूण<br><br><br><br>बोंड अळी</td><td>क्लोरोपायरीफॉस २० ईसी<br>ॲसिफेट ७५ एसपी<br>(कीटकनाशकात २० ग्रॅम धुण्याची पावडर मिसळावी<br>क्विनॉलफॉस २५ ईसी<br>थायोडीकार्ब ७५ डब्ल्यू पी<br>स्पिनोसॅड ४५एससी</td><td>३० मिली<br>२० मिली<br><br><br>२० मिली<br>२० ग्रॅम<br>४ मिली</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td></td><td>५</td><td>रोग व्यवस्थापन</td><td>दहिया हा रोग कपाशीवर येतो. ऑगस्ट महिन्यात सुरुवातीपासून हा रोग आढळतो. या रोगाचे लक्षण म्हणजे प्रथम झाडाच्या जुन्या पानावर खालच्या बाजूस पांढ-या रंगाचे पट्टे दिसून येतात.
<table>
<tr><th>रोग</th><th>व्यवस्थापन उपाय</th></tr>
<tr><td>करपा (पानावरील ठिपके )</td><td>.सिडोमोनास फ्लुरोसन्सची बीजप्रक्रिया १० ग्रॅम /कि.ग्रॅ. या प्रमाणात करावी.<br>पी.एफ.-१ द्रावणाची ०.२ टक्के तीव्रतेची किंवा कॉपर ऑक्सी क्लोराई २५ ग्रॅम / १० लीटर पाणी या प्रमाणात ३०,६० व ९० दिवसांनी फवारणी करावी.</td></tr>
<tr><td>दहिया</td><td>बावीस्टीन १० ग्रॅम किंवा ८० टक्के गंधक २५ ग्रॅम / १० लीटर पाणी या प्रमाणात ३०,६० व ९० दिवसांनी फवावरणी करावी.</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>९</td><td colspan="2">पिकाचा कालावधी</td><td>१६० ते १७० दिवस</td></tr>
<tr><td>१०</td><td colspan="2">उत्पादकता</td><td>१५ ते १६ क्विं. प्रती हेक्टर</td></tr>
<tr><td>११</td><td colspan="2">वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म</td><td>१. देशी व अमेरिकन कापसाच्या आंतरजातीय संकरातून निर्मित<br>२. बोंडाचा मोठा आकार<br>३. रूईचा अधिक उतारा<br>४. दहिया रोगास सहनशील</td></tr>
<tr><td>१२</td><td colspan="2">वाणासंबंधीचे छायाचित्रे</td><td></td></tr>
</table>